# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २७/२००९/ दिनांक :

श्री. मारुती ज्योतिराम गोरे, अर्जदार
रा. २०/१४२१, हनुमान नगर
इचलकरंजी, जि. कोल्हापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित
ब उप विभाग, इचलकरंजी

**कोरम :-** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०१.०६.२००९

श्री. मारुती ज्योतिराम गोरे, ग्रा.क्र. २५०३८०००९७६१० रा. २०/१४२१, हनुमान नगर, इचलकरंजी (तक्रार प्रकरण क्र. २७/०९) यांचे तेथे यंत्रमाग वीज कनेक्शन आहे. त्यावरील वीज बीले सप्टेंबर, ऑक्टोबर २००४ मध्ये भरली आहेत . तसेच नोव्हेंबर २००४ मध्ये रु. २२५०/- भरले आहेत.

त्यानंतर दंड, व्याजासह वीज बीले लावण्यात आली आहेत. ती लावणेत येऊ नयेत तसेच कारखाना बंद असतांनाचे काळात वीज मीटर बदलला. सीपीएलमध्य आर.एन.ए./ रिजेक्ट/फॉल्टी अशा नोंदी चुकीच्या झाल्या. बील दुरुस्त करुन देऊन हिशोब समजावून सांगावा अशी ग्राहकाची तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार, निवारण कक्ष, कोल्हापूर यांजकडे क्ष नमुन्यात दि. ९.४.२००९ रोजी अर्ज दाखल केला आहे. दरम्यान वीज पुरवठा खंडित केलेचे कारणास्तव त्यांनी त्या विरोधात मंचाकडे दि. १५.४.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यावर वि.प.चे संबंधित अधिकाऱ्याकडून तक्रारीवर मुद्देनिहाय म्हणणेची मागणी करण्यात आली व सुनावणी दि. ४.५.२००९ रोजी इचलकरंजी येथे ठेवणेत आली.

सुनावणीवेळी स्वत: तक्रारदार श्री. मारुती जोतिराम गोरे, वि.प.तर्फे श्री. शिंदे, उप कार्यकारी अभियंता, ब उप विभाग इ. हजर होते.

<u>तक्रारदार यांचे म्हणणे</u>

तक्रारदार यांचे वर नमूद पत्त्यावर दि. १७.७.१९९० पासून ५ अश्वशक्ती यंत्रमाग वीज कनेक्शन आहे. त्यावर वितरण कंपनीकडून आकारलेले बिलानुसार सप्टेंबर/ऑक्टोबर २००४ चे वीज बील रु. १३२६०/–दि. २०.१०.२००४ रोजी भरले आहे. तसेच पुढे दि. २.११.२००४ रोजी रु. २२५०/– भरले आहेत. त्यावेळी ग्राहकाचे नावावर कोणतीही थकबाकी नव्हती. परंतु पुढील बिलात बाकी दाखविलेमुळे वि.प.चे अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बाकी गैंरलागू असलेचे सांगितले व बील दुरुस्तीची मागणी केली. परंतु त्याची दाद घेतली नाही. त्यामुळे वीज बिलात दंड व व्याज लागले. पुढे ऑगष्ट, सप्टेंबर २००६ मध्ये कारखाना बंद केला असता मीटर बदलला. सीपीएलवर आरएनए/रिजेक्ट/फॉल्टी अशा नोंदी झाल्या आहेत. बील दुरुस्ती करुन घ्यावी. दंड, व्याज लावू नये. सदर रक्कम भरणे करिता हप्ते मिळावेत. वीज पुरवठा पूर्व सूचनेशिवाय बंद केला आहे तो सुरु करुन मिळावा इ. मागण्या केल्या.

<u>वितरण कंपनीचे म्हणणे</u>

तक्रारदार यांचे नांवे वरील पत्त्यावर असलेल्या वीज कनेक्शनवर फेब्रुवारी २००९ अखेर वीज बिलाची येणे बाकी रु. १,३५,४३५/– आहे. पैंकी ग्राहकाने रु. १३२६०/– रक्कम भरलेली दिसून येते. शासन परिपत्रक क्र. ७१७ दिनांक ३१.८.२००४ नुसार यंत्रमाग संजीवनी सवलत योजनेचा रु. ६३१४५/–लाभ देणेत येऊन उर्वरीत रु. ७२२९०/– ग्राहकाकडून बिलापोटी येणे आहे व त्यानुसार सदर रकमेचे वीज बील ग्राहकास दि. २०.४.२००९ रोजी देणेत आले आहे. ग्राहकाचे मे २००५ पासून फेब्रुवारी २००९ पर्यंत काढलेल्या रकमानुसार एकूण वीज आकार रु. १,०१,७१५.६० त्यावरील वीज कर रु. ६१०२.९३ व विक्रीकर रु. २४८.०८, रु. १२५३/– व जादा सुरक्षा रक्कम अशी एकूण रु. १,१४,१९९.६१ रक्कम होती. पैंकी सरासरी बील रु. ८३६७.२१ वजा जाता विलंब आकार रु. २७९३.०१ व व्याज रु. २३३५३.४३ धरुन एकूण रु. १,३१,९७८.८४ येणे रक्कम होते. त्यापैंकी ग्राहकाने रु. ५९,३००.०० सध्या भरणा केलेले आहे व शिल्लक रु. ७२,६७८.८४ भरणे आहे. ग्राहकास सदर काळातील बीले देणेत आलेली आहेत व ग्राहकाचा दरम्यानचे काळात बीले मिळाली नाहीत त्यासंबंधी कोणताही अर्ज वि.प.चे कार्यालयास प्राप्त झाला नाही. सबब ग्राहकास देण्यात आलेली बीले योग्य आहेत.

<u>सदस्य सचिव यांचा निष्कर्ष</u>

तक्रार प्रकरणाचा आढावा घेतांना दिसून येते की, तक्रारदार श्री. मारुती जोतीराम गोरे यांनी ऑक्टोबर, नोव्हेंबर २००४ पर्यंतच्या वीज बिलांची रक्कम रु. १३२६०/– व नोव्हेंबर २००४ ला रु. २२५०/– भरले आहेत. त्यापुढील काळात वि.प.ने ग्राहकास नियमित बिले दिलेली आहेत. परंतु ग्राहकाने ती भरलेली नाहीत. परंतु मध्यंतरी दि. ९.११.२००५ रोजी रु. २०,०००/–, दि. २७.३.२००६ रोजी रु. २०,०००/– व दि. २२.८.२००६ रोजी रु. १९,३००/– अशा रकमा भरल्या आहेत. त्या व्यतिरिक्त बीले भरली नाहीत. तसेच जर ग्राहकास बीले मान्य नसलेस तसा त्यांनी त्यावेळी कोणताही पत्र–व्यवहार वि.प.शी केलेला निदर्शनास येत नाही. सोबत जोडलेल्या अर्जाच्या प्रती व वि.प.शी बिलाबाबत केलेला लेखी पत्र–व्यवहार मार्च २००९ नंतरचा आहे. या वरुन ग्राहकाची त्यावेळच्या मे २००५ पासून दिलेल्या बिलाबाबत तक्रार नव्हती हे स्पष्ट होते. दुसरे असे की, ग्राहकाने अधूनमधून मंदीमुळे कारखाना बंद ठेवला जात होता हे मान्य केले आहे. वि.प.ने अशा महिन्याचे ० युनिट वापर दाखवून बीले आकारलेली नाहीत. (एप्रिल २००७ ते फेब्रवारी, २००९) तसेच तक्रारदार यांना शासनाचे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिलेला आहे.

ग्राहकाने दि. २२.८.२००६ ला भरलेल्या रु. ५०,०००/– बाकीपैंकी रु. ३०,७००/– चा चेक वटला नसलेचे वि.प.ने नमूद केले आहे. मीटर बदललेचे ग्राहकाचे तक्रार मुद्दयावर वि.प.ने तो मा. विद्युत नियामक आयोगाचे सर्व औंद्योगिक ग्राहकांना टिओडी मीटर बसविणेचे आदेशांतर्गत बदलला असावा.

थोडक्यात, ग्राहकास देण्यात आलेली बीले व त्यावरील दंड व्याज योग्य आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रें, युक्तीवाद, बचाव विचारांत घेऊन सदस्य सचिव यांचेतर्फे खालील प्रमाणे आदेशे देणेत येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराचे अपील फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(एस.आर. बांबळे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी.सी.लेले सदस्य :

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

---

ग्राहक तक्रार क्र. २७/२००९/ दिनांक :

श्री. मारुती ज्योतिराम गोरे, अर्जदार
रा. २०/१४२१, हनुमान नगर
इचलकरंजी, जि. कोल्हापूर

**विरूध्द**

२) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित
ब उप विभाग, इचलकरंजी

**<u>कोरम</u> :-** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, ग्राहक सदस्य ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०१.०६.२००९

श्री. मारुती ज्योतीराम गोरे, रा. इचलकरंजी यांचे ग्रा. क्र. २५०३८००९७६१० चे पॉवरलूम वापरासाठीचे ५ एचपीचे कनेक्शन दि. १७.७.१९९० पासून चालू आहे. सप्टेंबर – ऑक्टोबर २००४ ला कंपनीने दिलेले रु. १३२६०/– चे बील भरुनही बिलावर दंड व्याजाची मोठी रक्कम दाखविली आहे. ती मजला मान्य नाही. तसेच सप्टेंबर २००४ पूर्वीही बिले लॉक, आर.एन.अे., फॉल्टी अशा स्वरुपातील दिली आहेत. एकंदरीत कंपनीने चुकीच्या पध्दतीने बीले केलेली आहेत. सदरची बीले दंड, व्याज मजला मान्य नाही अशा स्वरुपाची तक्रार सीजीआरएफकडे २७/०९ ने केली. त्याचे मुद्देनिहाय अभिप्राय मागविले व सुनावणी झाली. ग्राहकाने रु. ५,०००/– भरुन घेवून निर्णय होईतोपर्यंत वीज प्रवाह चालू करावा अशी विनंती करणारा अंतरिम आदेशासाठीचा अर्जही दाखल केलेला आहे.

सदर तक्रारी संदर्भात सदस्य सचिव यांनी केलेल्या न्याय निर्णयाशी व आदेशाशी मी ग्राहक सदस्य सहमत नसल्याने वेगळे मत नोंदवित आहे. ते खालील प्रमाणे –

ग्राहकाने दाखल केलेली तक्रार त्यावरील वि.प.ची भूमिका या संबंधी दाखल कागदपत्रे या सर्वांचा विचार करुन मी माझे मत नोंदवित आहे.

दि. २.११.२००४ रोजी रिकनेक्शन चार्ज रु. १००/– व मीटर कॉस्ट रु. २२५०/– पावती क्र. १८६०००६ ने भरलेले दिसतात व त्याचवेळी जुना मीटर काढून नवीन मीटर बसविलेला दिसतो. त्याच्याआधी पावती क्रमांक ४४५४८६२ दि. २७.१०.२००४ ने रु. १३,२६०/– इतकी रक्कम कंपनीने बिलात दर्शविल्याप्रमाणे ग्राहकाने जमा केली आहे. मंचाने सुनावणीच्यावेळी सदरची रक्कम जमा केल्यानंतरचा ग्राहकाच्या वीज वापराप्रमाणे नव्याने बिलाचे स्टेटमेंट देण्यास सांगितले होते. सदरचे स्टेटमेंट २६ मे २००९ रोजी मिळाले. त्यातील तपशिल तपासता बऱ्याच चुकीच्या नोंदी आढळून आल्या म्हणून संबंधित सहा.अभियंता यांचेशी संपर्क करुन नोंदीविषयी स्पष्टता करण्याबद्दल सांगितले. त्यास अनुसरुन वि.प.ने एक सीएमएस सीपीएल सादर केले. त्यावरुन स्टेटमेंट ताळा बघतांना अनेक चुकीच्या नोंदी आढळून आल्या. म्हणून परत चौंकशी करता, नव्याने व्हॉयरल सीपीएल सादर केले. या सर्वांचा मुद्दाम ऊहापोह केला आहे. कारण कोणतेही स्टेटमेंट एकमेकाशी जुळत नाही. कांही खुलासा मागितला तर उत्तर मिळत नाही.

२६ मे २००९ रोजी सादर केलेल्या डीपीसीच्या रकमा व व्याज कसे आकारणी केली आहे हे संगणक विभागासकट कोणीही सांगू शकत नाही. सदरचे डी.पी.सी. व व्याजाच्या रकमा मागील सीपीएलवरुन जशाचे तशा सुधारित स्टेटमेंटमध्ये घेतल्याचे दिसत आहे. त्यामुळे सदरच्या रकमा ग्राहकाच्या देय बाकीतून वजा करणे आवश्यक आहे. तसेच मंचाने बिलींग स्टेटमेंट मागितले होते त्यात रु. ४८००/– ॲडीशनल एस.डी. रक्कम अधिक दाखविली आहे. सदरची रक्कम जमा करुन घेण्याचा वि.प.चा अधिकार मी मान्य करीत आहे. तथापी बिलींग स्टेटमेंटमध्ये त्याची नोंद अनावश्यक आहे.

व्हायरल सीपीएल वरील मे २००५, जलैं २००५ मध्ये नोंदविलेल्या आकड्यांचा खुलासा वि.प.स करता आला नाही. ग्राहकांनी चुकीच्या नोंदी दुरुस्त करुन नव्याने बील द्या अशी केलेली मागणी वरील नोंदी पहाता योग्यच वाटते. तसेच रु. १३२६०/– हि रक्कम ज्या बिलाच्या आधारे भरुन घेतली त्या बिलावर

(देयक दि. २४.८.२००४) रु. ६८५३६.७१ इतकी रक्कम ॲडजेस्ट केली म्हणून नोंदविले आहे पण प्रत्यक्षात तशी नोंद सीपीएलवर नाही.



नोव्हेंबर २००४ मध्ये दाखविलेले सीपीएल वरील रु. ६३०२६.४५ इतकी व्याज रक्कम शासन संजीवनी योजनेप्रमाणे कमी करणे आवश्यक होते. मात्र ती फेब्रुवारी २००९ पर्यंत तरी कमी केलेली नाही. १८ मे २००९ च्या वि.प.च्या पत्रात रु. ६३१४५.२२ इतकी रक्कम संजीवनी योजनेप्रमाणे सूट दिल्याचे कळविले आहे. याचाच अर्थ ग्राहकाने दि. २४.३.२००६ पासून पाठपुरावा करुनही सदरची वजावट देण्यास १८ मे २००९ इतका प्रदीर्घ कालावधी लागला. ग्राहकाने योग्य बिलाची बाकी कळविण्यासाठी लिहिलेले दिसते.

या सर्व बाबींचा विचार करुन २६ मे २००९ रोजी दिलेल्या नवीन स्टेटमेंटप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| वीज आकार | .. | रु. १०१७१५.६० |
| वीज कर | .. | रु. ६१०२.९३ |
| विक्रीकर | .. | रु. १५०१.०८ |
| | | रु. १०९३१९.६१ |
| सरासरी बील (नोव्हे.०५) | .. | रु. ८७६७.२१ |
| | | रु. १००५५२.४० |
| वेळोवेळी जमा रक्कम | .. | रु. ५९३००.०० |
| बाकी देय रक्कम | .. | रु. ४१२५२.४० |

वरील प्रमाणे निर्देशित केलेली देय रक्कम तसेच वि.प.तर्फे अर्जदार ग्राहकाकडे पूर्वी मागणी केलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रु. ४८००/– अशी सर्व रक्कम अर्जदारास वि.प.कडे भरणे आवश्यक आहे. मात्र वरील देय रक्कम रु. ४१२५२.४० यामध्ये अर्जदाराचे विनंतीप्रमाणे हप्तेबंदी देणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने या निर्णयपत्रातील आदेशाप्रमाणे रक्कम भरलेस, त्याचे मागणीप्रमाणे व नियमाप्रमाणे विद्युत पुनर्जोडणी वि.प.तर्फे करणे आवश्यक आहे. सबब खालील प्रमाणे आदेश :

## आदेश

१) अर्जदाराचा अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) अर्जदाराकडे वि.प.ने दि. १८.५.२००९ चे पत्राप्रमाणे केलेली बिलाची एकूण मागणी रक्कम रु. ७२६७८.९४ ही रद्द करण्यात येत आहे.

३) या निर्णयपत्राप्रमाणे अर्जदाराकडे फेब्रुवारी २००९ अखेर एकूण येणे रक्कम रु. ४१२५२.४० निश्चित करण्यात येत आहे.

४) तसेच अर्जदाराने अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रु. ४८००/– ही वि.प.कडे वेगळी भरणे आहे.

५) अर्जदाराच्या देणे रकमेपैंकी अर्जदाराने पहिला हप्ता रक्कम रु. २१२५२.४० हा वि.प.कडे दि. १५.७.२०००९ पर्यत भरावा व उरलेली देय रक्कम रु. २०,०००/– ही दुसरा हप्ता रु. १०,०००/– दि. १५.८.२००९ पर्यंत भरावा तसेच तिसरा हप्ता रु. १०,०००/– दि. १५.९.२००९ पर्यंत भरावा.

वरीलपैंकी कोणताही हप्ता अर्जदाराने भरणे चुकविल्यास, त्यावेळी असलेली बाकी रक्कम एकरकमी वसूल करण्याचा अधिकार वि.प.स देणेत येत आहे.



६) वरील हप्तेबंदी प्रमाणे पहिला हप्ता रु. २१२५२.४० हा अर्जदार ग्राहकाने दि. १५.७.२००९ पर्यंत भरल्यानंतर अर्जदारास विद्युत पुरवठा पाहिजे असल्यास नियमाप्रमाणे पुनर्जोडणीसाठी वि.प.कडे अर्ज करावा व अशा अर्जासोबत अर्जदाराने वि.प.कडे पूर्वी मागणी केलेली व वर दर्शविलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रु. ४८००/- वि.कडे भरावी. सुरक्षा ठेव रक्कम भरल्याशिवाय विद्युत पुनर्जोडणी करुन घेण्याचा अर्जदारास अधिकार राहणार नाही.

७) या अर्जाच्या खर्चाबाबत आदेश नाही.

८) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

९) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य ग्राहक
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष :

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :